**<u>खटला क्र. ९३४/पीडब्ल्यु/२००५</u>** **<u>निशाणी क्र. ४</u>**

साक्षीदार क्र. १
मी शपथपुर्वक सांगतो की,
माझे नाव : मनोहर नामदेव कंदलकर
वय : ६९ वर्षे,
व्यवसाय : वकीली
पत्ताा : माहिम, मुंबई

**सरतपासणी सरकारी वकील श्री. रविंद्र पाटील :—**

१. माझे श्रीभुषण बिल्डींग, आर. के. वैदय रोड, दादर, मुंबई — २८ येथे कार्यालय आहे. दिनांक १.०१.२००५ रोजी मी सदरील कार्यालयात सकाळी ११.०० वाजता बसलो होतो. सायंकाळी ६.३० ते ६.४५ च्या दरम्यान मी लघुशंकेसाठी माझ्या कार्यालयाच्या पाठीमागे स्वच्छता गृहाकडे गेलो होतो. मी स्वच्छता गृहाकडे जाताना माझा पॅनोसोनिक कंपनीचा निळा रंगाचा मोबाईल चार्जिंगसाठी टेबलवर ठेवला होता. मी परत कार्यालयात आल्यानंतर मला तो मोबईल दिसला नाही. मी त्यानंतर आजुबाजुला चौकशी केली. परंतु मला काही माहिती मिळाली नाही. त्यानंतर मी शिवााजी पार्क पोलिस स्टेशनला गेलो व अज्ञात इसमा विरुध्द तक्रार केली. मला आता प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझाी स्वाक्षरी नमूद असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. प्रथम खबरी अहवाल हा **निशाणी क्र. ५** वर आहे.

२. मी फिर्याद दाखल केल्यानंतर मला पोलिसांकडुन कुठलीही माहिती मिळाली नाही. माझा मोबाईल तपासा दरम्यान जप्त करण्यात आला किंवा कसे तसेच तो कोणाकडुन जप्त करण्यात आला याबाबतची मला वैयक्तीक माहिती नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

स्वाक्षरी:—
**(वैभव व. कुलकर्णी)**

**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**५ वे न्यायालय, दादर, मुंबई.**

**दिनांक : ३१/०१/२०२५.**